<u>**प्रेस नोट दिनांक १४/०३/२०१९**</u>

<u>**चंदननगर पोलीस स्टेशन, पुणे शह**</u>

<u>**पोलीस स्टेशन येथे जेष्ठ नागरिक मिटींग झाले बाबत**</u>**...**

दिनांक १३.३.२०१९ रोजी १८.०० ते १९.३० वा. दरम्यान जेष्ठ नागरीक संघ वडगावशेरी व जेष्ठ नागरीक संघ, चंदननगर यांमधील जेष्ठ नागरिक सदस्यांची पोलीस स्टेशन या ठिकाणी मिटींग झाली. मिटींग मध्ये जेष्ठ नागरिक यांच्याशी संवाद साधुन त्यांना काही अडचणी /शंका असल्यास त्या विचारून त्यांचे निरसन केले. त्यांच्या सुरक्षिततेसंबंधाने चर्चा करुन, त्यांना पोलीसांकडुन देण्यात आलेल्या जेष्ठ नागरीक ओळखपत्राबाबत चर्चा झाली. पोलीस आयुक्त कार्यालय पुणे या ठिकाणी मा. पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी सुरु केलेल्या भरोसा सेलमधील कामकाजाची व नागरिकांना तेथे देण्यात येणाया मदतीविषयी माहीती देण्यात आली आहे. त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल या अनुषंगाने मार्गदर्शन केले. पुणे पोलीस आयुक्तालयाकडुन राबविण्यात आलेल्या १४ योजनाबाबत माहीती दिली. पोलीस स्टेशनकडुन नागरीकांच्या सोईकरीता बडीकॉप, पोलीस काका, सायबर क्राईम, वाहतुक सुरक्षा, जेष्ठ नगारीक सुरक्षा या उपक्रमांची माहिती दिली. महिलांना कोणत्याही प्रकारच्या मदतीची आवश्यकता असल्यास महिला हेल्पलाईन क्र.१०९१ ची माहिती देवुन पोलीस नियंत्रण कक्षाचे १०० नंबर, पोलीस स्टेशन फोन नं.०२०/२७०१२३२१ व व्हॅटस् ॲप ग्रुपवर संदेश देण्याचे सुचित करण्यात आले आहे. सदर वेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कृष्णा इंदलकर, सर्व चौकी अधिकारी, कर्मचारी व ५० ते ५५ जेष्ठ नागरीक जनसमुदाय हजर होता.

सदर मिटींगचे दरम्यान घेण्यात आलेले फोटो खाली सादर केलेले आहेत.




कृष्णा इंदलकर

